दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १२ ऑक्टोबर २०२५ | अंक २९० • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**

१४९२ : ख्रिस्तोफर कोलंबस वेस्ट इंडिजम धील बहामास येथे पोहोचला.आपण भारतात पोहोचलो आहोत असा त्याचा समज झाला.

SUN Tourism International Pvt. Ltd. Since 2007 · All Tours घर से घर तक · दिल से दिल तक · www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार – आ.संदीप क्षीरसागर

## बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष आणि सर्व जागेवर नगरसेवक निवडून आणणार – आ.संदीप क्षीरसागर

### पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला विश्वास बैठकीला हजारो पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती

बीड दि.११ (प्रतिनिधी):- बीड नगर पालिकेच्या निवडणुकीत आपलाच उमेदवार नगराध्यक्ष म्हणून निवडून येणार असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला. आगामी बीड नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि.११ (शनिवार) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) च्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मोठी गर्दी पाहावयास मिळाली. हजारोच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवार उपस्थित होते. या बैठकीत आ. संदीप क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना नगर परिषद निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार





निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना म्हणाले की,अतिवृष्टीच्या पावसामुळे अनेक ग्रामीण भागात नुकसान झाल्यामुळे नगर पालिकेची निवडणूक अगोदर होणार आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधक जातीचे राजकारण करतील. त्यांना न जुमानता जोमाने कामाला लागा. लोकांना काम करून दाखवायचे आहे. लोकांचे काम केले तर लोक डोक्यावर घेतील. लोकांशी संवाद साधून त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तत्पर रहा. प्रत्येक वॉर्डात कार्यकर्त्यांनी समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. येणाऱ्या नगर पालिकेच्या निवडणुकीत पक्ष प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. तसेच बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष पदाचा आपलाच उमेदवार हा १० हजार मताने निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्व जागेवर नगरसेवक निवडून येतील. आमदारकीच्या निवडणुकीत सोबत राहिलेल्या आणि माझ्यासाठी एकनिष्ठ प्रामाणिक राहून काम करणाऱ्या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांसाठी घरातला सदस्य समजून काम करून निवडून आणणार ते असल्याचे सांगून कार्यकर्त्यांना बळ दिले यावेळी आ.संदीप क्षीरसागरांना देखील कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्या जो उमेदवार देतील त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. यावेळी माजी आमदार सय्यद सलीम, पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटता कामा नये -आ.संदीप क्षीरसागर

शहरातील कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटली नाही पाहिजे. साखळी जर तुटली नाही तर नगर पालिका आपल्याच ताब्यात येणार. जर का कोणी उमेदवार साखळी तोडून गेला तर लोकांना तो माझा उमेदवार नाही असे सांगेल. साखळी तोडणाऱ्याला निवडणुकीत धडा शिकवण्यासाठी जनताच पुढाकार घेईल असा इशारा देखील आ.संदीप क्षीरसागरांनी बैठकीत दिला.

## आझाद क्रांती सेना ऊसतोड कामगार संघटनेच्या वडवणी तालुका अध्यक्षपदी लक्ष्मण आव्हाड . उपतालुकाअध्यक्षपदी पिंटू आडगळे यांची निवड.



वडवणी बीड प्रतिनिधी. अंकुश गवळी वडवणी तालुक्यातील आझाद क्रांती सेनेच्या विविध पदाधिकाऱ्यांचे निवडी जाहीर करण्यात आले आहेत, यावेळी आझाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेश घोडे यांच्या मार्गदर्शनानुसार, वडवणी तालुक्यातील ऊसतोड कामगार संघटनेची कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे, यावेळी आझाद क्रांती सेना ऊसतोड कामगार संघटनेच्या वडवणी तालुका अध्यक्षपदी लक्ष्मण आव्हाड, व उपतालुकाध्यक्षपदी पिंटू आडगळे यांची सर्वनुमती निवड करण्यात आली आहे. यांच्या निवडीबद्दल सर्व क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. यावेळी वडवणी तालुका अध्यक्ष विलास कारके यांनी दोन्ही नवनियुक्त अध्यक्ष यांना पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या,

## शिवसेना बीड जिल्ह्याच्या वतीने व डॉक्टर सेलच्या वतीने आज आरोग्य तपासणी व उपचार शिबीर पार पडले

गेवराई दि.11(प्रतिनिधी) :- गेवराई तालुक्यातील गोदाकाठी असलेल्या गावातील पूरग्रस्तांची आरोग्य तपासणी व उपचार तसेच जनावरांची तपासणी व औषधोपचार करण्यासाठी अनाथांचा नाथ म्हणून विशेष अशी ओळख असलेले महायुतीचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे तसेच शिवसेना डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष - डॉ.धनंजय पडवळ, पूर परिस्थितीचे गांभीर्य व साथीच्या रोगाचे गांभीर्य लक्षात घेऊन बीड जिल्ह्याचे तिन्ही जिल्हाप्रमुख यांनी स्वतः उपस्थित राहून या आरोग्य शिबिराचे आयोजन नियोजन केले व शिवसेनेच्या माध्यमातून व डॉक्टर सेलच्या माध्यमातून ही जनसेवा ईश्वर सेवा घडून आणून पूरग्रस्तांचे हात बनले अनिल दादा जगताप (शिवसेना जिल्हाप्रमुख बीड), सचिन भैय्या मुळूक (जिल्हाप्रमुख बीड) व स्वप्निल भैय्या गलधर यांच्या संकल्पनेतून शिवसेना डॉक्टर सेलच्या वतीने आज शनिवार रोजी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते शिबीराचा लाभ पूरग्रस्त गावातील 5 ते 6 हजार नागरिकांनी घेतला हे शिबीर तालुक्यातील भोगलगाव, राहेरी, बोरगांव थडी, गंगावाडी, पांढरी, मिरगाव, पांगुळगाव, सावळेश्वर, खामगाव, नागझरी, म्हाळसा पिंपळगाव या पूरग्रस्त गावातील नागरिक व जनावरांची आरोग्य तपासणी



करून आणि औषधोपचार करण्यात आले यावेळी अकरा गावातील नागरिकांनी शिवसेना पदाधिकारी व डॉक्टर सेलचे आभार मानले तसेच या शिबिरासाठी गेवराई तालुक्यातील शिवसैनिकांनी याचे काटेकोरपणे नियोजन केले . यावेळी गेवराई तालुक्याचे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अँड नारायण शिंदे विधानसभा प्रमुख नवनाथ जि गवते शहर प्रमुख मुकेश अण्णा महाजन युवा सेना तालुका प्रमुख बबन मोघे,ओबीसी तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर संतोष तपसे डाके मामा बालाजी कारंडे व तालुक्यातील मोठ्या प्रमाणात शिवसैनिक यामध्ये उपस्थित होते

# बीडमध्ये महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर !

## गांधीनगरमध्ये अल्पवयीन मुलीची छेड, नराधम आरोपी इरफान शेख ऊर्फ बाबा फरार

### पेठ बीड पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

बीड प्रतिनिधी:-पेठ बीड पोलीस ठाण्याअंतर्गत असलेल्या गांधीनगर परिसरात एका 14 वर्षीय अल्पवयीन मुलीची सार्वजनिक ठिकाणी छेड काढल्याची घटना घडली असून, या प्रकरणी संबंधित पीडित मुलीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आरोपीविरोधात पोक्सो आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणातील नराधम आरोपी शेख इरफान ऊर्फ बाबा शेख उस्मान सध्या फरार असून पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. या प्रकरणाचा तपास पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मोदीराज हे स्वतः करित आहेत.फिर्यादीनुसार अधिक माहिती अशी की, पीडित अल्पवयीन मुलगी ही दिनांक 10 ऑक्टोबर शुक्रवार रोजी दुपारी आपल्या बहिणीसोबत घराजवळील दुकानात गेली असताना गल्लीतील रहिवासी शेख इरफान उर्फ बाबा शेख उस्मान याने तिच्याशी वाईट वर्तन केले. आरोपीने शिट्टी मारून सदरील मुलीचा रस्ता अडवत हात पकडला. तू मला खूप आवडतेस माझ्यासोबत चल, असे म्हणत ओढण्याचा प्रयत्न केला. यावेळी तिच्या बहिणीने विरोध केला असता दोघींनाहीत्याने शिवीगाळ करत धक्काबुक्की केली.या प्रकाराबाबत आरोपीच्या आईकडे सुद्धा तक्रार केली मात्र आरोपीने पीडितेला धमकी दिली की, “माझ्याविरोधात तक्रार केलीस तर तुला जिवे मारून टाकिन व तुझ्या आई वडिलांना गल्लीत राहू देणार नाही,” प्रकरण अंगाशी येत असल्याचे लक्षात आल्यानंतर सदरील आरोपी फरार झाला. त्यानंतर पीडित मुलगी हिने आपल्या आई सोबत पेठ बीड पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दिली. पोलीसांनी या प्रकरणी तात्काळ कारवाई करत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला



आहे. आरोपीवर गु.र.क्र,287/2025 भारतीय न्याय संहिता कलम 74,75,115(2), 352, 351(2), आणि पोस्को कायद्याअंतर्गत 8,12, कलमानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.ही घटना गांधीनगर परिसरात खळबळ उडवणारी ठरली असून, अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. संबंधित आरोपी अद्याप फरार असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या प्रकरणाचा तपास पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मोदीराज हे स्वतः करत आहेत.या घटनेने महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर समाजातील महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. अल्पवयीन मुलींविरोधातील अशा घटनांकडे समाजाने आणि प्रशासनाने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.


## लुखेगाव येथे GeBBS फाउंडेशनतर्फे पूरग्रस्त नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर

लुखेगाव (ता. माजलगाव) — अलीकडील पूरामुळे गावातील नागरिकांना आलेल्या आरोग्याच्या अडचणी लक्षात घेऊन GeBBS फाउंडेशन, जालना यांच्या वतीने लुखेगाव येथे मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तज्ञ डॉक्टरांच्या टीमने गावातील नागरिकांची तपासणी करून सर्दी, ताप, त्वचारोग, पोटदुखी, संसर्गजन्य आजार आदी रोगांवर तत्काळ औषधोपचार दिले. पूरपश्चात उद्भवणाऱ्या आरोग्य समस्या लक्षात घेऊन नागरिकांना स्वच्छता, पिण्याचे पाणी शुद्ध करण्याचे उपाय व संसर्गापासून बचाव याबाबत




मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन ग्रामपंचायतचे सरपंच नासेरखा पठाण, ग्रामपंचायत अधिकारी महेश गेंदले, शाहेदखा पठाण, फेरोज पठाण व इतर नागरिकांच्या उपस्थितीत करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक पूरग्रस्त नागरिकांना तातडीचा दिलासा मिळाला. गावकऱ्यांनी GeBBS फाउंडेशनच्या या सामाजिक बांधिलकीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या आरोग्य शिबिरासाठी GeBBS फाउंडेशन जालनाचे अधिकारी, डॉक्टर, आरोग्यसेवक व स्थानिक ग्रामपंचायत यांचे सहकार्य लाभले.

## गव्हाण थडी येथील शिक्षकांना निरोप देताना डोळे पाणावले अध्यक्ष शालेय शिक्षण समिती नितीन पाटेकर




माजलगाव दै लोक इच्छा प्रतिनिधी फेरोज पठाण तालुक्यातील गव्हाण थडी येथील जिल्हा परिषद शाळा येथील शिक्षकांचे बदली झालेल्या शिक्षकांना निरोप देण्यात आला व बदली होऊन आलेल्या शिक्षकांचा सत्कार याचा कार्यक्रम झाला संपन्न झाल अक्षरशा विद्यार्थी व शिक्षकांच्या हे डोळ्यात पाणी आले शिक्षकाने विद्यार्थ्यांवर अतोनात प्रेम ज्ञान दिले त्यामुळे विद्यार्थ्यांना खूप वाईट वाटत होतं यावेळी या कार्यक्रमाला माजी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष भास्कर बप्पा पाटेकर सुशांत पाटेकर सुमंत डाके सिद्धेश्वर पाटेकर उपसरपंच इंद्रजीत पाटेकर भागवत आप्पा पाटेकर कृष्णा घुले शालेय शिक्षण समिती अध्यक्ष नितीन पाटेकर उपाध्यक्ष गणेश मुंडे व गावकरी यांनी श्री तांदळे सर व कचरे सर यांना निरोप देऊन बदली होऊन रुजू झालेले शिक्षक श्री जायभाये सर यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

# पुढाकार घेवून पदवीधर नोंदणी अभियानात सहभागी व्हा

### राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांचे अवाहन

बीड: छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघात पदवीधर मतदार नाव नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात बीड जिल्ह्यातील पदवीधरांनी नाव नोंदणी करावी, यासाठी काही अडचण आल्यास संपर्क करावा, असे अवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी केले आहे. प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या सन २०२६ मध्ये होणाऱ्या निवडणूकीसाठी मतदारयादी तयार करण्याचा कालबध्द कार्यक्रम निवडणूक आयोगाने घोषित केला आहे. पदवीधर मतदारसंघाच्या प्रत्येक निवडणूकीत मतदारांची नव्याने नावनोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानूसार मराठवाड्यात पदवीधर मतदार नावनोंदणी अभियान हाती घेतले आहे.



पदवीधर मतदारसंघाचे आ.सतिष चव्हाण हे सदरील अभियानाला गती देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात देखील हे अभियान यशस्वीरित्या राबविण्यात येणार आहे. यासाठी सर्व पदवीधरांनी या अभियानात सहभागी होणे आवश्यक आहे. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदार यादी दरवेळी नव्याने तयार करण्यात येते. त्यामुळे गतनिवडणुकीमध्ये मतदार नोंदणी केली असेल तरीही नोंदणी करणे आवश्यक आहे. नवीन नोंदणी करिता १ नोव्हेंबर २०२२ पूर्वीचा पदवीधर असणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, बीड या जिल्ह्यातील रहिवासी, असणे आवश्यक आहे.नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रात नमुना अर्ज क्र.१८, कोणत्याही विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र किंवा पदवीच्या अंतिम वर्षाची ‘मार्कशीट’ झेरॉक्स प्रत, पासपोर्ट साईज फोटो, मतदान ओळखपत्र/आधार कार्ड यापैकी एकाची झेरॉक्स प्रत, नाव बदल असल्यास गॅझेट/विवाह नोंदणी प्रमाणपत्र/प्रतिज्ञापत्र, भरलेला फॉर्म नं.१८ हे आवश्यक आहेत. १ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करावी लागणार आहे. सदरील नोंदणी तहसील कार्यालय येथे करावी लागणार आहे. यासाठी शासकिय यंत्रणा मदत करेलच परंतु काही अडचण आल्यास आमच्या कार्यालयातील विशाल कानडे मो.८४५९०८५२०० या नंबरवर संपर्क करावा, असे अवाहन राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी केले आहे.

# दिवाळी सणापूर्वी रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करा-अनिल पाटील कऱ्हाळे

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
किनवट : राष्ट्रीय महामार्गावरील गोकुंदा येथील पेट्रोल पंप ते ठाकरे चौक या प्रमुख बाजारपेठेतील रस्त्याची अवस्था जिव घेणी बनली असून खड्ड्यामुळे वाहनांचे अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असल्यामुळे दिवाळी सनापूर्वी या रस्त्याची मजबूत सुधारणा करावी उडानपुलाचे काम हाती घ्यावे अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) गटाकडून लोकशाही मार्गाने रस्तारोको आंदोलन करणार असल्याचे माजी सभापती अनिल पाटील यांनी राष्ट्रीय महामार्ग कार्यकारी अभियंता यांना निवेदनाद्वारे कळविले आहे.

किनवट ते भोकर या राष्ट्रीय महामार्गावरील गोकुंदा पेट्रोल पंप ते ठाकरे चौक या रस्त्यावर कित्येक दिवसापासून जागोजागी खड्यांचे साम्राज्य



पसरल्याने वाहनाधारकासह नागरिकांना जिवघेणा प्रवास करावा लागत आहे. मोठमोठे खड्डे व गिट्टी उघडी पडून असल्याने वाहनाचे अपघात होत आहेत. विशेष म्हणजे गोकुंदा येथे प्रमुख मार्गावर पेट्रोलपंप, महाविद्यालय, शाळा व उपजिल्हा रुग्णालय असल्याने दिवसभर रस्त्यावर वाहनासह विद्यार्थी व नागरिकांची वर्दळ असते मागील ३ महिन्याच्या पावसाळयाच्या कालावधीत पाण्याचे डबके तयार होऊन रस्त्याच्या बाजूने दुर्गंदी व घाण पसरली आहे.विध्यार्थी तसेच वृद्धमहिला पुरुषांना खड्यातून पायीपट करावी लागत आहे. गोकुंदा येथील रेल्वेगेट उडानपूल मंजूर असल्याचा कारणामुळे हा रस्ता दुरुस्त केला जात नाही. परिणामी खड्यामुळे व खराब रस्त्यामुळे वाहनधारकासह नागरीकांना प्रचंड यातना सोसाव्या लागत आहेत. विधानसभा निवणुकीच्या पूर्वी गोकुंदा येथील उडानपूल बांधकाम करण्यासंदर्भात कामाचे रेखाकन सुरु करण्यात आले होते. परंतु निवडणूक घोषीत होऊन आचार साहिंता लागू असल्याने हे काम थांबविण्यात आले होते. परंतु निवडणूका होऊन आजमितीस एका वर्षाचा कालावधी लोटला तरी उड्डाणपुलाचे काम सुरु झाले नाही किवा रस्त्याची सुधारणा केली नाही. अगोदर पासूनच किनवट ते भोकर या राष्ट्रीय महामार्गाचे बहुतांश काम 6 वर्षे लोटले तरी अर्धवट अवस्थेत असून काम पूर्ण होण्यापूर्वीच अनेक ठिकाणी राष्ट्रीय महामार्गाला तळे गेले आहेत.तात्काळ हा रस्ता दुरुस्त करावा अथवा उड्डाणपुलाचे काम तातडीने हाती घ्यावे.दिवाळी पूर्वी कार्यवाही झाली नाही तर राष्ट्रबादी कोंग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या वतीने लोकशाही मार्गाने रस्ता रोको आंदोलन करण्याचा ईशारा अनिल पाटील कऱ्हाळे यांनी दिला आहे.

# सारखणी येथे बंजारा समाजाने खा.अशोक चव्हाण यांचा ताफा अडवला बंजारा समाजाच्या एसटी प्रवर्गातून आरक्षणासंदर्भात भूमिका स्पष्ट करा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटकिनवट : माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा ताफा सारखणीजवळ बंजारा समाजाने अडवून त्यांना घेराव घातला. यावेळी आंदोलकांनी बंजारा समाजाच्या आरक्षणासंदर्भात तुमची भूमिका स्पष्ट करा, असा जाब विचारला. यावेळी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. किनवट तालुक्यात माजी मुख्यमंत्री तथा भाजप खासदार अशोक चव्हाण यांचा दौरा होता. किनवट तालुक्यातील सारखणी येथील तुळजाभवानी माता मंदिर येथून त्यांच्या गाड्यांचा ताफा जात असताना बंजारा समाजाच्या कार्यकर्त्यांनी तो अडवला. यावेळी प्रचंड घोषणाबाजी करत बंजारा समाजाने त्यांच्या आरक्षणासंदर्भात अशोक चव्हाणांनी आपली भूमिका का स्पष्ट केली नाही, याचा जाब विचारला.बंजारा समाज सबंध राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी हैदराबाद गॅजेटप्रमाणे एसटीमधून आरक्षण मागत आहेत. यासाठी वेगवेगळे मोर्चे सबंध राज्यात व जिल्ह्यात निघत आहेत. मात्र माजी मुख्यमंत्री खासदार राहिलेल्या अशोक चव्हाण यांनी याबाबत कुठलीही भूमिका स्पष्ट केली नाही किंवा त्यांच्या मोर्चाला पाठिंबा दिला नाही. बंजारा समाजाच्या आरक्षणाबाबत तुम्ही समर्थन का करत नाही, तुमची नेमकी भूमिका काय आहे, असा जाब विचारत प्रचंड घोषणाबाजी केली. एकच मिशन बंजारा आरक्षण, अशा




घोषणाही कार्यकर्त्यांनी दिल्या आणि त्यांना घेरावही घातला. त्यानंतर अशोक चव्हाणांनी त्यांच्या मागण्या समजून घेतल्या. याबाबत वरिष्ठांना बोलू, असे आश्वासन त्यांनी दिले. तरीही कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी सुरुच ठेवली होती. अचानक चव्हाणांना घेराव घातल्याने पोलीस देखील गोंधळून गेले. त्यांनी जमावाला समजावून चव्हाणांना वाट करुन दिली.

# वर्तमान काळात गर्भसंस्काराची आवश्यकता -डॉ.सुरेखा पवार निवघेकर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : वर्तमान युग हे स्पर्धेचे आहे, आहाराचे, पाण्याचे, हवेचे, विचाराचे, आचरणाचे, व्यवहाराचे प्रदूषण झाले आहे. त्याच बरोबर मानसिक ताणतणाव, मी पणा, अहंकार, स्वार्थ, लोभ, द्वेष इत्यादीचे प्रमाण वाढले आहे. व्यायामाचा अभाव, व्यसनाधीनता, बदलेली जीवनशैली, नकारात्मक विचार, विभक्त कुटुंब पद्धती, फास्टफूड, केमिकलयुक्त व भेसळयुक्त आहाराचे सेवन, मोबाईलचा अति वापर आणि सर्वात महत्वाचे म्हणजे वाढत्या वयात किंवा उशिरा लग्न होत आहेत.

वरील कारणामुळे स्त्री व पुरुषाच्या शाररीक व मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होऊन त्यांची प्रतिकार शक्ती कमी होत आहे. त्यामुळे पुरुषाचे पुरुष बीज व स्त्रीचे स्त्री बीज यांची सारत्व (Quality) व प्रमाण (Quantity) कमी होत आहे त्यामुळे असा स्त्री व पुरुषापासून जन्माला येणार्या मुला मध्ये विविध प्रकारच्या विकृती होत आहेत.

काही स्त्रियामध्ये गर्भ स्त्राव (Abortion) होत आहेत, कमी वजनाचे





बाळ होत आहेत काही बाळामध्ये जन्मजात विकृती होत आहे. कमी वयाचे बाळ जन्माला येत आहेत बाळाचे वजन कमी होत आहे. शिझर होण्याचे प्रमाण वाढत आहे जन्मानंतर बाळ वारंवार आजारी पडत आहे, बाळ जेवण करण्यास त्रास देतो, नेहमी रडतो, किरकीर करतो, हट्टी, चंचल स्वभावाचे, अस्थिर, मतिमंद, शाररीक व्यंग असलेले अशा अनेक प्रकारच्या विकृतीचे बाळ जन्माला येत आहे.

म्हणून गर्भधारणे पूर्वीच किंवा गर्भिणी अवस्थेत मध्ये गर्भसंस्कार केल्यास वरील प्रकारच्या विकृती होणार्या बाळामध्ये होत नाहीत व बाळ निरोगी, बुद्धिवान, संस्कारित, बाळ जन्माला येतात असा आमचा गेल्या २२ वर्षाचा अनुभव आहे. म्हणून बाळाच्या, कुटुंबाच्या व देशाच्या उज्वल भविष्यासाठी प्रत्येकाने गर्भसंस्कार कारणे आवश्यक आहे.

**डॉ. सुरेखा विश्वांबर पवार निवघेकर**
**आयुर्वेदिक हॉस्पिटल,**
**डॉक्टर प्लाझा,डॉक्टर लाईन,नांदेड**

## संपादकीय

### यूरिक एसिड वाढल्यानंतर काय लक्षणे दिसतात? कशी काळजी घ्यावी ?




युरिक एसिड शरीरात तयार होणारे असे केमिकल जे आपल्या खाण्या-पिण्याच्या वस्तू आणि पेशींपासून तयार होतो. युरिक एसिड रक्तातून किडनीतून लघवीच्याद्वारे बाहेर पडते. जर शरीरात युरिक एसिडचे प्रमाण जास्तच वाढले तर किडनीतून ते बाहेर पडले नाही. तर याची पातळी असामान्य रुपाने वाढते. अधिक प्रोटीन युक्त आहार, मद्याचे सेवन, लठ्ठपणा, चुकीची जीवनशैली आणि पुरेसे पाणी न प्यायल्याने युरिक एसिड वाढते. तसेच काही आजार, औषधे देखील याची पातळी वाढवू शकतो. युरिक एसिड वाढल्याने शरीराच्या अवयवात सूज आणि वेदना निर्माण होते. उच्च युरिक एसिडने सर्वसाधारण समस्या म्हणजे संधीवात होतो. ज्यात सांध्यात प्रचंड वेदना आणि सूज येते. याशिवाय एसिड किडनी स्टोनचे देखील कारण बनू शकते.ज्यामुळे लघवीला त्रास, वेदना आणि संक्रमण होऊ शकते. दीर्घकाळ युरिक एसिड वाढल्याने हार्ट अटॅक, हायब्लडप्रेशर आणि किडनीच्या गंभीर समस्या होऊ शकतात. शरीरातील सूज आणि ऑक्सीडेटिव्ह तणावाला वाढवते. ज्यामुळे हाडांवर आणि स्नायूंवर परिणाम होतो. अशात अनेकदा लोक सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे हा आजार हळूहळू गंभीर स्वरुप धारण करत असतो. यूरिक एसिड वाढल्याची लक्षणे काय ? आरएमएल हॉस्पिटलचे मेडिसिन विभागाचे डॉ. सुभाष गिरी सांगतात की युरिक एसिड वाढल्याची सुरुवातीची लक्षण हलकी असतात. आणि लोकांना सामान्य थकवा किंवा सांधेदुखी समजतात. सर्व साधारण लक्षणात सांध्यात अचानक दुखणे किंवा सूज येते. खास करुन अंगठा, गुडघा आणि टाचांमध्ये दुखते. यासोबतच, सांधे लालसर होणे, उष्ण वाटणे आणि कडकपणा जाणवणे हे देखील त्रास होतात. गंभीर प्रकरणात संधीवाताचा झटका वेगाने आणि अचानक वेदनेसह येतो. रात्रीच्या वेळी दुखणे जास्त वाढत असते. काही लोकांनी किडनी स्टोन,लघवीत जळजळ किंवा वारंवार लघवीला येण्याची समस्या निर्माण होते. याशिवाय थकवा, स्नायू कमजोर होतात. कधी कधी तापासारखे वाटते. जर ही लक्षणे वारंवार दिसू लागली तर लागलीच डॉक्टरांना दाखवून तपासणी आणि उपचार करुन घ्यावेत. कारण जर दुर्लक्ष केले तर दीर्घकाळ हे दुखणे सहन करावे लागू शकते.

# संवादाचे महत्व



दोन व्यक्तींच्या मनाचा सांकव म्हणजेच संवाद होय. सांकव म्हणजे पूल. हा पूल शब्दांचा, विचारांचा आहे. दोन व्यक्तींच्या मनातील जे विचार आहेत ते मुखावाटे बाहेर पडतात त्या वेळेला तो शब्दांचा पूल होतो. 'शब्द हा विचाराचा पुत्र आहे' असे म्हटले जाते. दोन व्यक्तींचा संवाद होतो. या संवादालाच आपण सांकव किंवा पूल असे म्हटले आहे.

मग या दोन व्यक्तींमधला संवाद जो आहे तो प्रभावीपणे मांडणं फार महत्त्वाचा आहे. यामध्ये समज गैरसमज होऊ देऊ नयेत. आपले म्हणणे प्रभावीपणे मांडताना समोरच्या व्यक्तीचे म्हणणे आपण तेवढेच प्रभावीपणे ऐकणे गरजेचे असते.

श्रवण आणि भाष्य यावरच आपला संवाद छान होतो. ज्या व्यक्तीची श्रवण शक्ती छान तो उत्तम वक्ता होऊ शकतो. आणि उत्तम वक्ताच छान श्रवण करतो.

बऱ्याचदा असे होते की आपण समोरच्याचे मत लक्षात न घेता त्याच्याबद्दल आपण मत आपले व्यक्त करतो. किंवा ती व्यक्ती आपल्या बाबत गैरसमजुतीमध्ये असते. याचे कारण फक्त उत्तर द्यायची घाई. एकमेकांचे विचार न समजता पटकन बोलण्याची घाई. कारण हल्ली संवाद हरवत चालला आहे. मग हा संवाद आपण नोकरी करतो त्या ठिकाणी असू दे किंवा आपल्या कुटुंबामध्ये असू दे. संवादाचे रूप हल्ली व्हाट्सअप च्या माध्यमातून पूर्ण केले जाते. पण तेवढे हे प्रभावी साधन नाही. आणि मग गैरसमजुतीला फाटे फुटले जातात.

एकमेकांच्या विचारांची कदर केली जात नाही. एकमेकांच्या भावना ऐकून घेतल्या जात नाहीत किंवा त्या भावना समजून घेतल्या जात नाहीत. यासाठी आपल्या संवादांमध्ये आपल्याला संवाद कला फार समजून घेण्याची गरज आहे असे वाटते.

एकमेकांशी संवाद साधताना समोरच्याला विचारात घेतले पाहिजे. त्याच्याही मनाचा विचार केला पाहिजे. एकमेकांची नाती दृढ झाली पाहिजेत. संवाद हा प्रामाणिक व्हायला हवा. भावना जपायला हव्यात. आणि मग भावनांचा शब्दांचा आणि प्रामाणिकपणाचा दोन व्यक्तीला छान सांकव तयार होईल. आणि या सांकवावरून जाणे फार सोपे होईल. बऱ्याचदा हे भावनिक नाते समजून घेताना शब्द अपुरे पडतात. शब्दांची जागा भावना घेते. मग ही भावना जी आहे ती डोळ्यातून सुद्धा प्रकट होते चेहऱ्यावर प्रकट होते. हे समजून घेण्यासाठी खरंच आपल्या नयनांची भाषा फार महत्त्वाची वाटते. मग खऱ्या अर्थाने आपला संवाद प्रभावी ठरला जातो.

एकमेकांना समजून घेण्यासाठी काही टिप्स फार महत्त्वाच्या वाटतात. आपण एकमेकांशी संवाद करताना आय कॉन्टॅक्ट ठेवायला हवे. एकमेकांच्या नजरेला नजर देऊन आपण बोलले तर आपल्याला भावनात्मक भाष्य छान जमते.

आपण एकमेकांशी संवाद साधताना चेहऱ्यावरचे हावभाव आपले आपोआप बदलत असतात ते हावभाव बदललेले आहेत ते जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.

त्या भाष्यावर ताबडतोब कोणतीही प्रतिक्रिया देण्याऐवजी आपण थोडा वेळ त्या शब्दांचा, त्या वाक्यांचा, त्या व्यक्तीच्या भावना यांचा विचार करून मग आपण बोलूयात.

कोणत्याही व्यक्तींच्या शब्दांचा, भावनांचा, प्रामाणिकतेचा विचार करावा भावनांना जागा द्यावी आणि मग तो संवाद आपला अतिशय उत्कृष्ट होतो. समोरच्याला समजून घेऊन त्याच्याशी बोलावं आणि आपले भाष्य आपण तसेच ठेवावे. बघा हा संवाद आपला प्रभावीपणे होतो की नाही. यातून गैरसमज गळून पडतील.

या विचारपूर्वक संवादातून एक अनोखे नाते छान तयार होईल.

तर प्रत्येकाने, आपण एक नवीन धोरण ठरवूया की 'मी शांतपणे समोरच्याचे ऐकून घेईन, त्या भाषावर विचार करेल, शब्दांना आणि भावनांना किंमत देईन, आणि मग मी माझी प्रतिक्रिया शांतपणे देईन.'

यामुळे संवाद कला वाढेल. विचारांना चालना मिळेल. भावनेतून, विचारा अंती घेतलेला निर्णय केव्हाही अचूक ठरतो. आपल्या शब्दातून राग, द्वेष निर्माण होऊ देऊ नये.

संवाद अचूक निर्माण करावा
आपुलकीने भाष्य करावे
राग, द्वेष, मत्सर टाळावे
आत्मसन्मानाला न भुलावे....

**वसुधा वैभव नाईक**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १२ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## सोन्याची लकाकी अजून किती दिवस टिकणार?




सोन्याने 2025 मध्ये सर्व रेकॉर्ड मोडीत काढले. सोन्याने रेकॉर्ड मोडत 4000 डॉलर प्रति औंसच्या उंबरठ्यावर पोहचले आहे. भारतात तर काही बाजारात सोने सव्वा लाखांच्या घरात पोहचले. 24 कॅरेट सोने आता सर्वसामान्यांच्या हाताबाहेर पोहचले आहे. सोन्याच्या वाढत्या किंमतींमुळे जगभरातील खरेदीदार आणि गुंतवणूकदार धास्तावले आहे. इतक्या महाग दामाने सोने खरेदी करायचे आणि दर जर घसरले तर? असा प्रश्न त्यांना सतावत आहेत. त्यात आता जागतिक सोने परिषदेने (World Gold Council) धोक्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे सोन्याच्या लकाकीला भूलू नका. काय आहे तो इशारा?

सोन्याचा बाजारा आता बहरला आहे. सोने 4000 डॉलर्सपेक्षा प्रति औंसवर पोहचले आहेत. बाजार सोन्याची दरवाढ रोखू शकलेला नाही. एक दोन दिवस वगळात सोन्याची सातत्याने घोडदौड सुरू आहे. ज्या गतीने सोने आगेकूच करत आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही असे वर्ल्ड गोल्ड कॉन्सिलने नमूद केले आहे. या अहवालानुसार, गेल्या महिन्यात जागतिक ईटीएफमध्ये 145.6 टन सोन्यात गुंतवणूक करण्यात आली. त्याचे मूल्य 17.3 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहेत. तर गोल्ड ईटीएफमध्ये 221.7 टन सोने राखीव आहे. याचे मूल्य जवळपास 26 अब्ज डॉलर्स इतके आहे.


WGC ने सोन्याच्या आधारावरील एक्सचेंज ट्रेडेड फंडांवरील त्यांचा मासिक अहवाल जाहीर केला आहे. त्यानुसार तिसऱ्या तिमाहीत विक्रमी गुंतवणूक झाल्याचे म्हटले आहे. तर सप्टेंबरमध्ये 60 टक्क्यांपेक्षा अधिक गुंतवणूक झाल्याचे म्हटले आहे. तज्ज्ञांच्या मते, सोन्याच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे ॲसेट मॅनेजमेंट उच्चांकावर पोहचले आहेत. तर नोव्हेंबर 2020 पेक्षा यामध्ये 2 टक्क्यांपर्यंत घसरले आहे. स्थानिक बाजारपेठांमधील गुंतवणूकदारांनी सोन्याकडे मोर्चा वळवला आहे. भारतात सोन्यात 902 दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक झाली आहे. शेअर बाजारातील कमकुवत धोरण आणि भू-राजकीय आणि व्यावसायातील चढउताराच्या सत्रामुळे सध्या गुंतवणूकदार सोन्याकडे वळाले आहेत.

त्या धोक्याकडे दुर्लक्ष करू नका

WGC ने एक अहवाल दिला आहे. त्यात इशारा दिला आहे. गुंतवणूकदारांनी मोठी मागणी केल्याने गेल्या काही महिन्यात किंमती शिगेला पोहचल्याचे त्यात म्हटले आहे. किंमतीत लक्षणीय वाढ झाल्याचे अहवालात सांगण्यात आले आहे. पण याचा अर्थ बाजार सतत याच उच्चांकावर अथवा त्यापेक्षा अधिक उंचीवर जाईल असे नसल्याचे अहवालात म्हटले आहे. अहवालानुसार, किंमतीत केव्हा पण घसरण होऊ शकते. वर्षाच्या अखेरीस अजून तेजी येऊ शकते.

# दिवाळी आधीच गावगाड्यात पोहचला सगर दीपोत्सव दिवाळी अंक

नाशिक [ प्रतिनिधी ]श्री स्वामी समर्थ कृपाकिंत सगर साहित्य परिवार निर्मित संपादक साहेबराव नंदन तात्या संपादीत, ललीतभाऊ साळवे, प्रा. डी. टी. पाटील, राजेंद्र गवळी, आर. जे. पाटील सह सहसंपादक असलेला दरवर्षी गावकुसाच्या काळ्याकसदार मातीच्या सुंगधाने व वैचारिक साहित्याने न्हाऊन निघत आलेला, यंदाही सर्वत्र न्हाऊन निघालेला, साहित्य क्षेत्रात व समाजात सर्वत्र चर्चेत राहून कौतुकास पात्र ठरलेला ह्या वर्षीचा चौथा सगर दीपोत्सव दिवाळी अंक २०२५. दिवाळी पर्वआधीच सर्वत्र प्रसिद्ध झाल्याने वाचकांच्या हृदयात जाऊन बसल्याच्या अनेक बोलक्या प्रतिक्रिया उमटत असल्याचे संपादक गावगाडाकार साहेबराव नंदन [ तात्या ] यांनी साहित्य चर्चेत सांगितले. एकाच वेळी




नाशिक नागपूर अमरावती छत्रपती संभाजी नगर धुळे नंदुरबार जळगाव ते चंद्रपूर नव्हे नव्हे संपादक द्वयीच्या मुळगाव ताहाराबाद येथे देखील बहुतांशी वाचकांच्या हाती अंक निदर्शणास येत असल्याची बोलकी भावोत्कट छबी ताहाराबादचे मा. सरपंच सगर रत्न पुरस्कार्थी ह.भ.प. काशिनाथ [ बापूजी ] नंदन हे हातात अंक घेऊन निवांतपणे दृष्टीक्षेप टाकत आहेत. गुणी वाचकांच्या हाती अंक पोहचविण्यात सगर साहित्य परिवार बहुतांशी यशस्वी झाल्याचे समाधान व्यक्त केले जात आहे. वाढत्या महागाईच्या काळात अंक काढणे प्रसिद्ध करणे वेळेत वाचकांच्या हाती देणे शक्य होत नसले तरी तो निभावण्याचा अल्पसा प्रयत्न संपादकद्वयी दरवर्षी करत आले आहेत. अंकाची कुठेही विक्री केली जात नाही हे विशेष. शिवाय साहित्य क्षेत्रात सर्वत्र मोफत वितरण करण्यात येते. ना नफा ना तोटा ह्या तत्वावर अंकाचे कामकाज सुरू आहे. अंकाच्या निर्मिती प्रकाशन पोस्टेज साठी बहुतांशी जाहीरातदार व समाज बांधव खेच्छेने सहकार्य करतात. त्याचा कुठेही गाजावाजा नसतो. गेल्या तीन वर्षाच्या कालखंडात सगर साहित्याची निर्मिती असलेल्या सगर रत्न विशेषांक , सगर सेवार्थी व्यक्तिविशेष , स्नेहबंध विशेषांक , गावगाडा काव्यसंग्रह , परिसस्पर्श व्यक्ति चरित्र कादंबरी, मागील तीन सगर दीपोत्सव दिवाळी अंक सर्वच साहित्याला राज्यस्तरीय विविध संस्थाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ह्या ही अंकाला एका संस्थेचा लवकरंच राज्यस्तरीय पुरस्कार मिळणार असल्याचे कळते.

# बीड शहरातील अंगणवाड्यात सावळा गोंधळ

## बीड शहरातील अंगणवाडी तपासणी करावी. सोमेश्वर कदम

बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील अनेक अंगणवाड्यांमध्ये गंभीर अनियमितता आढळून आल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. बालकांना दिला जाणारा खाऊ, पोषण आहार, तसेच गरोदर मातांना मिळणारा हक्काचा आहार हा प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत न पोहोचता साठवून ठेवला जात असून बालकांचा व गरोदर मातांच्या आहार कोणाच्या घशात ? असा सवाल मनसेचे सचिव सोमेश्वर कदम यांनी केला आहे. अंगणवाडी तपासणी दरम्यान समजले की बालकांना नियमितपणे खाऊ दिला जात नाही. राज्यातील एकही बालक कुपोषित होऊ नये म्हणून राज्य सरकारकडून बालकांना शालेय पोषण आहार दिला जातो, प्रत्यक्षात मात्र हा आहार त्या बालकापर्यंत पोहोचत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.तसेच अंगणवाडीतील पटसंख्या दिसून येत नाही. तसेच अंगणवाड्याला वेळेचे बंधन देखील नसल्याची बाब समोर आली आहे. अनेक अंगणवाड्या ह्या वेळे आधीच बंदच असल्याची देखील माहिती मिळत आहे. बालकांना दिला जाणाऱ्या आहारामध्ये चिक्की, राजगिरा लाडू,खिचडी तसेच इतर पौष्टिक खाऊचे साहित्य बालकांना वाटप न होता सेविकांकडून घरी नेले जात असल्याच्या तक्रारी पालकांनी केल्या आहेत. बीड शहरातील काही अंगणवाड्यामध्ये गरोदर मातांची नोंदणी करण्यास अंगणवाडी सेविका टाळाटाळ केली जात असल्याचा गंभीर प्रकार देखील समोर आला आहे,

# वडवणीत पहिल्यांदाच थेट जनतेतून नगराध्यक्ष कोणाला मिळणार लोकमान्यतेचा मान ओबीसी महिला आरक्षण सुटल्याने मोर्चेबांधणीस वेगाने होणार सुरुवात

वडवणी (प्रतिनिधी): राज्यातील २४७ नगरपरिषदा व १४७ नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सोमवार दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. मंत्रालयातील ६ व्या मजल्यावरील नगरविकास विभागाच्या दालनात नगरविकास राज्यमंत्री ना. माधुरीताई मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आले. वडवणी नगरपंचायतीचे आरक्षण हे ओबीसी महिला सुटल्याने राजकीय समीकरणात उलथापालथ होणार असुन एक वर्ष राहिलेल्या निवडणूकीसाठी सर्वच राजकीय पक्ष मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात होणार आहे. वडवणी नगरपंचायतीच्या राजकारणात ऐतिहासिक बदल घडणार आहे. होणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीत पहिल्यांदाच नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जाणार आहे. आतापर्यंत नगराध्यक्षांचा कारभार नगरसेवकांच्या निवडीवर अवलंबून होता. परंतु यावेळी मतदारांना थेट नगराध्यक्ष




निवडण्याची संधी मिळणार आहे. वडवणी नगरपंचायतीच्या आगामी निवडणुकीत या वेळी पहिल्यांदाच नगराध्यक्ष जनतेतून थेट निवडला जाणार असल्यामुळ स्थानिक राजकारणात नवे समीकरण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नगराध्यक्षपदासाठी ओबीसी महिला आरक्षण सुटल्याने वडवणीत ओबीसी समाज मोठ्या संख्येने असल्याने अनेक इच्छु कांच्या संधी वाढल्या आहेत. त्यामुळे शहरातील विविध पक्ष व गट हे मोर्चेबांधणीस सुरुवात करणार असून उमेदवारांची नावांची चर्चा देखील भावी नगराध्यक्ष म्हणून सुरू झाली आहे. वडवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी कोण बसणार याकडे संपूर्ण तालुक्यात चर्चा रंगु लागली आहे. येत्या काही दिवसांत राजकीय घडामोडींना वेग येणार असून नागरिकांमध्येही याबाबत उत्सुकता दिसून येत आहे. वडवणी नगरपंचायतीचा हा बदल केवळ प्रशासनिक नाही, तर राजकीय दृष्ट्याही निर्णायक ठरणार आहे. पुढील काही दिवसांत स्थानिक राजकारणात नवी समीकरणं, आघाड्या आणि गाठीभेटी वाढण्याची शक्यता आहे. वडवणी नगरपंचायतीच्या स्थापनेपासून आतापर्यंत नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमार्फत होत होती मात्र आता पुढची होणारी निवडणूक ही थेट जनतेतून होत असल्याने वडवणीच्या राजकारणात नव्या अध्यायाची सुरुवात होणार आहे. राजकीय समीकरणे लवकरच बदलण्याची शक्यता असून सर्व पक्षांतून संभाव्य उमेदवारांच्या चर्चेला जोर आला आहे. वडवणीच्या नागरिकांमध्ये या निवडणुकीतजनतेतून नगराध्यक्ष होण्याचा मान कोणाला मिळणार याची उत्सुकता लागली आहे.

# म्हणून पांदण रस्ते ग्रामीण जीवनाचा कणा आहेत - आ.डॉ.गुट्टे

## गंगाखेड मतदारसंघात १८० किमीचे १८० रस्ते मंजुर :मातोश्री ग्राम समृद्धी पांदण रस्ते विकास अंतर्गत निधी

मकरंद चिनके गंगाखेड

शेती ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारवड असून, शेतकऱ्यांना शेतीमाल बाजारात नेण्यासाठी दर्जेदार आणि टिकाऊ रस्ते असणे, ही काळाची गरज आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांना नवसंजीवनी मिळण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील होतो. त्यासाठी राज्य शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता. परिणामी, त्यास यश आले आहे. त्यामुळे आपल्या मतदारसंघात नव्याने होणारे हे रस्ते पावसाळ्यातील चिखलाच्या त्रासातून गावकऱ्यांची सुटका करतील आणि सर्व ऋतूंमध्ये उपयोगी ठरतील. कारण, पांदण रस्ते म्हणजे फक्त मातीचे रस्ते नसून ग्रामीण जीवनाचा कणा आहेत, असे प्रतिपादन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अंतर्गत 'मातोश्री ग्राम समृद्धी पांदण रस्ते' योजनेखाली गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील तब्बल १८० किलोमीटरच्या १८० रस्त्यांना अंतिम मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून आ.डॉ.गुट्टे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला होता. त्यामुळे त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले आहे. परिणामी, ग्रामीण भागातील संपर्क सुविधा, शेतीमाल वाहतूक आणि दळणवळण यांना नवी गती देणारा हा निर्णय ग्रामविकासाच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरणार आहे. गंगाखेड, पालम आणि पूर्णा या तीन तालुक्यांमध्ये या योजनेची अंमलबजावणी होणार आहे. अंतिम मंजुरी मिळालेल्या आकडेवारीनुसार, गंगाखेड तालुक्यात २० रस्ते (२० किलोमीटर), पालम तालुक्यात ७ रस्ते (७ किलोमीटर) आणि पूर्णा तालुक्यात तब्बल १५३ रस्ते (१५३ किलोमीटर) मंजूर झाले आहेत. या रस्त्यांमुळे गावोगावी दळणवळण सुधारेल, बाजारपेठांपर्यंत शेतीमाल पोहोचवणे सुलभ होईल तसेच शालेय विद्यार्थी, महिलावर्ग आणि वृद्ध नागरिकांसाठी प्रवास अधिक सुरक्षित बनेल, असा विश्वास आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केला. दरम्यान, अंतिम मंजुरी मिळालेली रस्त्यांची ही कामे म्हणजे माझ्या मायबाप जनतेच्या विश्वासाचे यश आहे. गावागावांत सिमेंट पांदण रस्ते उभारून आपल्या लोकांना चांगल्या दर्जेदार सुविधा उपलब्ध होतील. या कामासाठी राज्य सरकारने दाखवलेले सहकार्य विशेष उल्लेखनीय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मिळालेले हे यश म्हणजे ग्रामीण भागाच्या पायाभूत सुविधांना मिळालेली मोठी चालना ठरेल. कारण, माझ्या माय-बाप जनतेचे प्रेम आणि विश्वास हेच माझे खरे बळ आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी स्पष्ट केले.

# राजकारणांत समोरा - समोर लढु परंतु सामाजिक प्रश्नी कायम सर्वांसोबत - आमदार प्रकाश सोळंके - माजलगावात छ.शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकांचे भुमिपुजन

माजलगाव प्रतिनिधी: राजकारणांत समोरा - समोर लढु परंतु सामाजिक प्रश्नी कायम सर्वांसोबत असल्याचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगीतले. शहरातील नविन बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचे तर जुन्या बसस्थानकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक होणार असुन या स्मारकाच्या भुमिपुजन कार्यक्रमात दि. 10 शुक्रवारी ते बोलत होते. अध्यक्षस्थांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप हे तर उद्घाटक म्हणुन आमदार प्रकाश सोळंके होते. या कार्यक्रमास माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, बाबुराव पोटभरे, अच्युत लाटे, दयानंद स्वामी, उपसभापती श्रीहरी मोरे, जयसिंह सोळंके, विरेंद्र सोळंके, खुर्शिद नाईक, सभापती जयदत्त नरवडे, विजय साळवे, अविनाश जावळे, डॉ. अशोक तिडके, खलील पटेल, कचरू खळगे, नासेर पठाण, सुरेंद्र रेदासनी नवनाथ धाईजे, अभिजित पोटभरे, अभय होके पाटील, भिमराव टाकणखार, अरूण राउत, अर्जुन नाईकनवरे, धम्मानंद साळवे, भास्कर शिंदे, राजेश साळवे, अमोल शेरकर, संतोष जेथलिया ईश्वर खुरपे सिध्दार्थ ससाणे, राकेश साळवे, दिनकर शिंदे, उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस विलास नेमाणे, विठ्ठल तुपसौंदर, अभिजित कोंबडे, आगार प्रमुख सुहास कोळपकर मुख्याधिकारी पोपट निघळ यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना आ. सोळंके म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक व दोन्ही चौकांचे सुशोभिकरण दर्जेदार करण्यात येणार आहे असे सांगीतले तर बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी सांगीतले की, महापुरूषांचे स्मारक यातुन त्यांची प्रेरणा मिळते. हे दोन्ही स्मारक माजलगावकरांच्या अस्मितेचा प्रश्न होता. मार्गी लागला यामागे सर्व माजलगावकरांचे श्रेय आहे. यावेळी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांनी 1978 पासुन या दोन्ही स्मारकांच्या पाठपुराव्याचा आलेख सर्वांसमोर मांडला तर




यावेळी विजय साळवे, अविनाश जावळे, दयानंद स्वामी यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन धनंजय सोळंके तर आभार तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी मानले. माजलगाव मतदरसंघामध्ये नगरविकास खात्यामार्फत उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी भरिव निधी दिलेला असल्याने मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाली आहेत. शहरामध्ये होत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य - दिव्य स्मारकांकरीता ना. एकनाथराव शिंदे यांचेकडुन मोठ्या




प्रमाणावर निधी आणण्यात येईल. आगामी नगरपालिका निवडणुकीत माजलगाव नगरपालिकेचे नगराध्यक्षपद शिवसेनेसाठी सोडावे असेही शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी सांगीतले. शहरातील जुन्या बसस्थानकात भव्यदिव्य असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक होणार असनु नविन बस्थानकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होणार आहे. या स्मारकाच्या भुमिपुजनाचे आयोजन शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, धनंजय सोळंके, अभिजित कोंबडे यांनी केले होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार १२ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# 100 रुपयात कोंबडी मिळते का? चिकनचा भाव काय? शेतकऱ्यांच्या मदतीवरून ठाकरे संतापले

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यां शेतकऱ्यांचे संपूर्ण पीकच वाहून गेले आहे. अनेक ठिकाणी शेतातील जमीनही खरडून गेली आहे. शेतकऱ्यांचे हे नुकसान लक्षात घेऊन राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदत जाहीर केली आहे. मात्र ही मदत अपुरी आहे, असा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. असे असतानाच आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सरकारवर शेतकरी कर्जमाफी आणि शेतकऱ्यांची मदत या मुद्द्यांवरून टीकाचे आसूड ओढले आहेत. राज्य सरकारने कोंबडीचे झालेले नुसकान आणि या नुकसानीसाठी सरकारने दिलेली मदत यावरून तर ठाकरे चांगलेच संतापले आहेत. आता बाजारात जा आणि चिकनचा भाव पाहा

काही दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीत पशूधनाचेही मोठे नुकसान झाले. यात गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या पुराच्या पाण्यात वाहून गेल्या. अनेक कुक्कुटपालन केंद्रातील कोंबड्यांचा मृत्यू झाला. हीच बाब लक्षात घेऊन सरकारने कुक्कुटपालक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार प्रति कोंबडी 100 रुपयांची मदत देण्यात येत आहे. हाच मुद्दा घेऊन ठाकरेंनी सरकारला धारेवर धरलं. सरकार नाक वर करून म्हणतंय की शेतकऱ्यांना ५ हजार रुपये पिकविमा देऊ. पण हा पीकविमा कुठून देणार. कसे देणार. कोंबडी गेली तर एका कोंबडीला १०० रुपये दिले जात आहेत. आता बाजारात जा आणि चिकनचा भाव पाहा. मुंबईत दीडशे दोनशेवर हा भाव चालला असेल, असा हल्लाबोल ठाकरेंनी केला. तसेच एका गायीसाठी




३७ हजार रुपये. ३७ हजारात दूभती गाय मिळते का. एका गायीला १ लााख रुपये लागतात. पैसे आणायचे कुठून? असा थेट सवालही ठाकरेंनी केला.

### शेतकऱ्याला हेक्टरी 50 हजार रुपयांची मदत करावी

शिवसेनेच्या ठाकरे गटाने आज (11 ऑक्टोबर) छत्रपती संभाजी नगरात हंबरडा मोर्चाचे आयोजन केल होते. या मोर्चात माजी मंत्री तथा आमदार आदित्य ठाकरे, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे तसेच इतर प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी जोरदार भाषण केले. या भाषणात त्यांनी सरकारने दिलेल्या मदतीवरून कठोर शब्दांत टीका केली. शेतकऱ्यांच्या कर्जाचे पूनर्गठन नको आहे. शेतकऱ्यांचे कर्ज थेट माफ करा. शेतकऱ्याला हेक्टरी 50 हजार रुपयांची मदत करावी, अशी मागणी केली.

# माजलगाव तालुक्यातील पुरग्रस्थांना श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचा मदतीचा हात

माजलगाव- नवरात्रौत्सवात बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे गोदावरी व सिंधफणा नदीच्या काठावर असलेल्या गावांना पुराचा तडाखा मोठ्या प्रमाणात बसला अनेक कुटुंबांची आर्थिक स्वरूपात नुकसान झाले. अशावेळी अखिल भारतीय श्री स्वामी सम र्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथील पिठाधीश परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने गुरुपुत्र नितीन भाऊ मोरे यांच्या उपस्थितीत माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, मंजरथ , देपेगाव , सांडस चिंचोली, आळसेवाडी, गंगामसला येथील पुरग्रस्थांना किराणा किट्स, साड्या,



ब्लँकेट इतर जीवनावश्यक वस्तू देऊन मदत करण्यात आली या स्तुत्य व समाजोपयोगी उपक्रमांमध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल तसेच बीड जिल्हा मराठी पत्रकार संघानेही आपले योगदान दिले. यावेळी मंडळ अधिकारी सोपान सोनवणे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ शामसुंदर काकाणी, डॉ शिवाजीराव काकडे, डॉ यशवंत राजेभोसले, डॉ अशोक घुबडे, डॉ अभिजित सोळंके, रोटरी क्लब ऑफ म ाजलगाव सेंट्रल चे पांडुरंग चांडक, मराठी पत्रकार संघाचे हरिष यादव, पांडुरंग उगले, सावंत तसेच सर्व पत्रकार बांधव, माजलगाव तालुक्यातील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातील सेवेकरी उपस्थित होते.



माजलगाव येथे जिवा महाले जयंती निमित अभिवादन करताना गोविंद झगडे व आदि मान्यवर

## धोबी- परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण द्या.... निवेदनाद्वारे मागणी




परळी वैजनाथ दि.११ (प्रतिनिधी)

धोबी - परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण द्या या मागणीचे निवेदन येथील धोबी - परीट समाजाच्या वतीने तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांना देण्यात आले आहे.

धोबी- परीट समाज महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती पूर्वी म्हणजे १९६० मध्ये बुलढाणा व भंडारा जिल्ह्यांमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या राजपत्रात अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट होता. मात्र महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर शासनाने कोणताही ठोस पुरावा न देता या समाजाला इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गात वर्गीकृत केले.यामुळे धोबी-परीट समाजाला पूर्ववत अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा धोबी - परीटसमाजाच्या वतीने देण्यात आला आहे. यासंदर्भातील मागणीचे निवेदन येथील धोबी - परीट समाजाच्या आरक्षण समन्वय समितीच्या वतीने तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांना देण्यात आले आहे.

# धर्म एकतेसाठी हवा मतभेदासाठी नव्हे,संग्राम जगतापने समाजात फूट पाडू नये- वसीम मणियार प्रदेश सचिव महाराष्ट्र राज्य.

राज्यात गेल्या काही दिवसांत हिंदू-मुस्लिम समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न वाढताना दिसत आहेत. आमदार संग्राम जगताप, आमदार पडळकर सारखी काही राजकीय नेते आणि संघटना सम ाजात तणाव निर्माण करणारी विधाने करत असल्याने सर्वसाम ान्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.धर्माच्या नावावर मतं मिळिवण्याचा डाव रचला जात असल्याचे स्पष्ट होत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी धर्माच्या आधारावर कार्यक्रम, मोर्चे आणि घोषणा देण्यात येत असून, सलोख्याने राहणाऱ्या समाजात मतभेद निम र्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. बीड सारख्या सलोखा भरल्या मातीत हिंदू मुस्लिमात मुद्दाम हून फूट पाडण्याचा प्रयत्न केला जातोय. शासन प्रशासन अनब यंत्रणेने द्वेष पेरणाऱ्या आमदारांना येत्या १४ तारखेची परवानगी देऊ नये अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटातर्फे आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रदेश सचिव महाराष्ट्र राज्य वसीम मणियार यांनी केले..






# आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नाने मुख्यमंत्री सहायता निधी व विविध शासकीय योजनांद्वारे अनेक रुग्णांना नवसंजीवनी...

**गेल्या वीस वर्षांपासून अविरत रुग्णसेवा देणारं अवलिया आरोग्य सेवक विकास साळवे**

*पाटोदा (प्रतिनिधी “दु:खात असलेल्या माणसाला आधार देणं, हेच खरं देवपूजेचं काम आहे,” — या भावनेला मूर्त रूप देत आष्टी तालुक्यात गेल्या दोन दशकांपासून ‘रुग्णसेवा’ हेच आपले ध्येय मानून काम करणारे समाजसेवक विकास साळवे यांनी हजारो रुग्णांना जीवनदान दिलं आहे. मराठवाडा भूषण, लोकनेते आ. सुरेश धस यांच्या प्रेरणेतून आणि माध्यमातून त्यांनी सामाजिक कार्याला नवा आयाम दिला आहे.

गोर-गरीब, शेतकरी, मजूर, कामगार, आजारपणाच्या चक्रात सापडलेल्या कुठल्याही रुग्णाला मदत मिळावी म्हणून विकास साळवे हे नेहमी रात्री कितीही वाजता आ.सुरेश धस यांचा फोन आला की तात्पुरतेने पोहोचतात. आणि त्या रुग्णांची मदत करतात. मुख्यमंत्री सहायता निधी, पीएम निधी प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (आयुष्यमान भारत), माझी कुटुंब माझी जबाबदारी, तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी अत्यंत तत्परतेने काम केलं आहे.

आ.सुरेश धस यांच्या अथक प्रयत्नांतून आतापर्यंत अनेक रुग्णांचे महागडे ऑपरेशन, हृदयविकार, किडनी, कर्करोग व व्हेंटिलेटर आवश्यकता असेलच तर आम्ही सोय करतात धर्मदाय रुग्णालयात बेड सवलती फायदा करून देतो गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना आर्थिक मदत मिळाली आहे. काही जणांना वेळेवर रक्त, औषधे, आणि रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देत त्यांच्या कुटुंबाचे आयुष्य बदलले आहे. आ. सुरेश धस यांच्या माणुसकीच्या स्पर्शाने आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली ही रुग्णसेवा मोहीम केवळ एक उपक्रम न राहता “माणुसकीचा श्वास” बनली आहे.आ. धस यांच्या “जनतेसाठी, जनतेच्या मनातून” या कार्यपद्धतीचा परिणाम म्हणून आज हजारो कुटुंबे आ.धस यांच्या नावाने कृतज्ञतेने स्मरण करतात. रुग्णसेवक विकास साळवे व दता हुले, सोमनाथ कोल्हे, अमर वाळवे,सुशील ढोले,प्रतिक काळे या टीमच्या माध्यमातून दर आठवड्याला शेकडो रुग्ण बरे होतात, रुग्णांना शासकीय मदतीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली जाते, हॉस्पिटलपर्यंत पोहोचण्यासाठी सहकार्य दिलं जातं. विकास साळवे यांचे हे कार्य आज अनेक सामाजिक संघटनांसाठी आदर्शवत उदाहरण ठरत आहे. “रुग्णसेवा हीच खरी देशसेवा” हे वाक्य विकास साळवे यांनी केवळ उच्चारलेलं नाही, तर ते जगून दाखवलं आहे. त्यांच्या या सेवाभावी वृत्तीला आ. सुरेश धस यांचे प्रोत्साहन आणि आधार लाभत असून आज मराठवाड्यातील जनतेच्या आशेचा दीपस्तंभ बनली आहे.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com